आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ नोव्हेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा प्रधानमंत्र्यांचा इशारा

- दोन दिवसीय दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भूतानमधे दाखल

- राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आरक्षण सोडत जाहीर

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान सुरू, दुपारी एक वाजेपर्यंत ४७ पूर्णांक ६२ शतांश टक्के मतदान

**आणि**

- आय एस एस एफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात सम्राट राणानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. भूतान इथं एका कार्यक्रमात ते बोलत होते. काल रात्रीपासून स्फोटाचा तपास करणाऱ्या यंत्रणांकडून सातत्यानं माहिती घेत असून या स्फोटामागच्या खऱ्या सुत्रधाराला तपास यंत्रणा शोधून काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संपूर्ण देश स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

- **- -होल्ड बाईट मोदी** - - -

लाल किल्ला इथल्या स्फोटानंतर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे प्रमुख, दिल्ली पोलिस आयुक्त, राष्ट्रीय तपास संस्थेचे महासंचालक उपस्थित होते. जम्मू आणि काश्मिरचे पोलीस महासंचालक या बैठकीला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते.

लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ एका गाडीत काल संध्याकाळी सातच्या सुमारास एक शक्तीशाली स्फोट झाला. या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत.

दिल्लीतल्या स्फोटाला जबाबदार असलेल्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आज आयोजित केलेल्या संरक्षणविषयक कार्यक्रमात ते बोलत होते. स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना सिंह यांनी आदरांजली वाहिली. ही  घटना दुर्दैवी असून सरकारनं अतिशय गंभीर दखल घेतली आहे. दोषींविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये बातमीदारांना सांगितलं.

सुरक्षेच्या कारणास्तव लाल किल्ला मेट्रो स्थानक बंद ठेवल्याचं दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनं कळवलं आहे. सुरक्षेच्या कारणास्तव गुरुवारपर्यंत लाल किल्लाही पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज सकाळी भूतानमध्ये दाखल झाले. भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांनी मोदी यांचं विमानतळावर स्वागत केलं. अनेक शतकांपासून भारत आणि भूतान मधले सांस्कृतिक, राजकीय संबंध अतिशय चांगले असून भविष्यातही ते वृद्धिंगत होतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी थिंपू इथं आयोजित कार्यक्रमात व्यक्त केला.

भूतानसाठी, भूतानच्या राजघराण्यासाठी आणि जागतिक शांततेवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी आजचा दिवस महत्त्वाचा असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं.

भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या एक हजार २० मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांग-छू दोन या जलविद्युत प्रकल्पाचं उद्घाटन प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात अकोला इथे २०२३मध्ये झालेल्या दंगलींचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकात हिंदू आणि मुस्लीम अशा दोन्ही समुदायातल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश असावा, या निकालाला आज सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली. ११ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या या निकालाचा आढावा घेण्याची विनंती करणारी याचिका महाराष्ट्र सरकारनं दाखल केली होती. या याचिकेवर आज सरन्यायायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

<><><><><>

राज्य सरकारच्या नक्षल आत्मसमर्पण योजनेला प्रतिसाद देत जहाल नक्षलवादी, आणि दलम सदस्य कोसा मंगलू उईका, उर्फ वर्गेश यानं काल  गोंदिया पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. लहानपणापासूनच तो नक्षलवादी चळवळीत सक्रिय होता. त्याच्यावर साडेतीन लाख रुपयांचं बक्षीस होतं. माओवादी संघटनेत होणारा त्रास आणि अत्याचाराला कंटाळून वर्गेशनं आत्मसमर्पण केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

छत्तीसगढ-महाराष्ट्र सीमेवरच्या बस्तर, बिजापूर आणि गडचिरोली जिल्ह्यात असलेल्या  जंगलात आज सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांची चकमक झाली. या चकमकीत काही नक्षलवादी ठार झाल्याची प्राथमिक माहिती सुरक्षा दलानं दिली. जिल्हा राखीव दल, कोब्रा कमांडो आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली.

<><><><><>

राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आज आरक्षण सोडती जाहीर झाल्या.

**परभणी** महानगरपालिकेतल्या १६ प्रभागांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण- महिला तसंच सर्वसाधारण अशा प्रवर्गांचं आरक्षण निश्चित करण्यात आलं.

**छत्रपती संभाजीनगर** महानगरपालिका निवडणुकीसाठी आज सोडत जाहीर झाली. त्यात ११५ सदस्यांपैकी ५८ जागा महिलांसाठी तर इतर मागास प्रवर्गासाठी ३१,

अनुसूचित जातीसाठी २२ आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २ जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

**धुळे महानगरपालिकेतल्या** १९ प्रभागांतील ७४ जागांच्या आरक्षणाची सोडत आज जाहीर झाली. यात ३७ जागा महिलांसाठी राखीव असून त्यातही ३ जागा अनुसुचित जमाती प्रवर्गातील महिलांना तसंच अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलांसाठी ३ जागा राखीव आहेत. मागास प्रवर्गातील महिलांसाठी १० जागा आरक्षित झाल्या आहेत. अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती प्रवर्गासाठी प्रत्येकी पाच जागा आरक्षित असून महिला ओबीसी प्रवर्गासाठी १८ जागा आरक्षित आहेत. उर्वरित जागा सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आहेत.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानाला आज सकाळी सुरुवात झाली. दुपारी १ वाजेपर्यंत ४७ पूर्णांक ६२ टक्के इतकं मतदान झालं होतं.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी १२२ मतदारसंघात ४५ हजार मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. या टप्प्यात १ हजार ३०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून तीन कोटी ७० लाख मतदार या उमेदवारांमधून आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नेपाळला लागून असलेल्या सीमा तसंच उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडला लागून असलेल्या सीमा बंद करण्यात आल्याचं पोलीस महासंचालक विनय कुमार यांनी सांगितलं. तसंच भारत-नेपाळ सीमेवरील मैत्री एक्स्प्रेस रेल्वे सेवा निवडणुकीपुरती बंद केल्याचंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, ७ राज्यांमधल्या ८ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. जम्मू काश्मीरमधे बडगाम आणि नागरोटा, राजस्थानमधे अंता, झारखंडमध्ये घाटशिला, तेलंगणात ज्युबिली हिल्स, पंजाबमध्ये तरनतारन, मिझोराममध्ये डम्पा आणि ओदिशात नुआपाडा या मतदारसंघांसाठी आज मतदान होत आहे. मतमोजणी १४ नोव्हेंबर रोजी म्हणजेच बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी दिवशीच होणार आहे.

<><><><><>

इजिप्तमध्ये कैरो इथे सुरू असलेल्या आय एस एस एफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात सम्राट राणा याने काल सुवर्णपदक जिंकलं. त्याने २४३ पूर्णांक ७ गुणांची कमाई केली. एअर पिस्तुल गटात वैयक्तिक जागतिक विजेतेपद मिळवणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. याच स्पर्धेत वरुण तोमरला कांस्यपदक मिळालं आहे. या दोन्ही नेमबाजांनी पात्रता फेरीत प्रत्येकी ५८६ गुणांची कमाई केली आहे. पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल प्रकाराच्या सांघिक स्पर्धेतही भारताच्या सम्राट राणा, वरुण तोमर आणि श्रवण कुमार यांनी सुवर्ण पदक पटकावलं. महिलांच्या गटात मनू भाकर, ईशा सिंग आणि सुरुची सिंग या तिघींनी सांघिक प्रकारात रौप्य पदक मिळवलं. या पदकांसह भारताची पदकसंख्या ९ झाली असून त्यात तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्यपदकांचा समावेश आहे.

<><><><><>

भारत, हरित हायड्रोजन क्षेत्रात उत्पादन, वापर आणि निर्यातीचं केंद्र बनावा असं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले. ते आज नवी दिल्ली इथं झालेल्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय हरित हायड्रोजन परिषदेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. हरित हायड्रोजनकडे पर्याय म्हणून नाही तर आर्थिक स्रोत म्हणून पाहणं गरजेचं असल्याचंही ते यावेळी म्हणाले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत हरित हायड्रोजन उत्पादनाशी संबंधित विषयांवर आणि विविध क्षेत्रांमधल्या त्याच्या प्रायोगिक वापरावर चर्चा होणार आहे.

//<><><><><>//